**<u>मासेमार संकट निवारण निधी</u>**
**मासेमारी करताना अपघाती मृत्यू झाल्यास**
**मच्छिमारांच्या वारसांना द्यावयाचे अर्थसहाय्य**

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्रमांक मत्स्यवि १००६/७९(१३)/पदुम-१४
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १ एप्रिल, २००८.

वाचा :- १) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्र. मत्स्यम ११९३/१७१९/१९१/पदुम-१४ दिनांक १ ऑगस्ट, १९९४.
२)शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्र. मत्स्यवि १०९६/(२७२)/पदुम-१४ दिनांक २ सप्टेंबर, १९९६.
३) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्र. मत्स्यवि १०९६/(२७२)/पदुम-१४ दिनांक २९ सप्टेंबर, १९९८.

**शासन निर्णय :-** शासन निर्णय क्रमांक मत्स्यम ११९३/१७१९/१९१/पदुम-१४, दिनांक २९ सप्टेंबर, १९९८ नुसार मासेमारी करताना मच्छीमारांचा अपघाती मृत्यू झाल्यास/ बेपत्ता झाल्यास त्यांच्या वारसांना रु.५०,०००/- इतके अर्थसहाय्य मंजूर करण्याबाबत आदेश आहेत. सध्या देण्यात येत असलेल्या अर्थसहाय्यात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार आता मासेमार संकट निवारण निधी योजने अंतर्गत मासेमारी करताना मच्छिमारांचा अपघाती मृत्यू अथवा मच्छिमार बेपत्ता झाल्यास त्यांच्या वारसांना रु. १,००,०००/- (रुपये एक लाख फक्त) अर्थसहाय्य मंजूर करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. त्याप्रमाणे मच्छिमारांच्या वारसांना अर्थसहाय्य मंजूर करण्याचे अधिकार आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांना देण्यात येत आहेत.

२. या संदर्भात मच्छिमारांच्या वारसांना अर्थसहाय्य मंजूरीची कार्यपध्दती यापूर्वी निर्गमित केलेल्या शासन निर्णय, दिनांक १.८.१९९४ व दि २९.९.१९९८ मधील अटी व शर्ती कायम असतील.

३. यासाठी लागणारी आवश्यक ती तरतूद आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांनी राखीव निधीऐवजी सरळपणे महसूली अथवा भांडवली शिर्षातून उपलब्ध करुन घ्यावी.

४. हे आदेश दिनांक १ जून, २००८ पासून अंमलात येतील.

४.	हा शासन आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३८३/ व्यय-१, दिनांक २८.१.२००८ अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५.	हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावरुन प्रसारित करण्यात आला असून त्याचा सांकेतिक क्रमांक **२००८०४०२१६०७२३००१** असा आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**(म.ह.सोनकुसरे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
उपसंचालक (सागरी), आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांचे कार्यालय, मुंबई.
प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती.
सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक, मुंबई/ठाणे (पालघर) रायगड (अलिबाग)/रत्नागिरी/ सिंधुदुर्ग (मालवण)/भंडारा/चंद्रपूर.
सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक, कोळंबी बीज उत्पादन केंद्र, बाडापोखरण,ता.डहाणू,जिल्हा ठाणे.
सर्व जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी.
मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, गोदिया, जिल्हा भंडारा/ब्रम्हपुरी, जिल्हा चंद्रपूर.
वित्त विभाग (व्यय-१)/(अर्थसंकल्प-३)/ (अर्थसंकल्प-१४/अर्थोपाय) मंत्रालय, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा परीक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा), नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखाधिकारी, मुंबई.
जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे/रायगड (अलिबाग)/रत्नागिरी/सिंधुदुर्ग.
मा.मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव.
मा.राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव.
कार्यासन अधिकारी, पदुम-१२,पदुम-१३,पदुम-१६, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती.